# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विद्यापरिषदेच्या ६७ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.१२ जुलै, २०२४ दुपारी ०३:०० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

विद्यापरिषदेची ६७ वी (तातडीची) ऑनलाईन बैठक शुक्रवार, दि.१२ जुलै, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वा. मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली आहे.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. आय. जे. तांबोळी<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ९) | प्राचार्य डॉ. शशिकांत एल. तांबे<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| १०) | प्रा. (डॉ.) विकास बाबुराव पाटील<br>प्र.संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य | उपस्थित |
| ११) | प्राचार्य डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य | अनुपस्थित |
| १२) | प्राचार्य डॉ. सुरेश रामचंद्र ढेरे | सदस्य | अनुपस्थित |
| १३) | प्राचार्य डॉ. चंद्रकांत जगन्नाथ खिलारे | सदस्य | अनुपस्थित |
| १४) | प्राचार्य डॉ. चंद्रकांत श्रीपती सुर्यवंशी | सदस्य | अनुपस्थित |
| १५) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. सुधा गिरजाप्पा बनसोडे | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. गंगाधर धुळप्पा बिराजदार | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. रविकांत यशवंतराव पाटील | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| २०) | डॉ. श्रीमती लक्ष्मी चंद्रकांत मुशन | सदस्या | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २१) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे | सदस्य | उपस्थित |
| २२) | डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे | सदस्य | उपस्थित |
| २३) | डॉ. तानाजी नारायण कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| २४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| २५) | श्रीमती वैशाली जितेंद्र साठे | सदस्या | अनुपस्थित |
| २६) | डॉ. जयंत मारुती गजभिये | सदस्य | उपस्थित |
| २७) | डॉ. धनंजय ए. जोल्हे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २८) | श्री. विजय रविंद्रनाथ जवळगेकर | सदस्य | अनुपस्थित |
| २९) | श्री. वासुदेव रंगनाथ बंग | सदस्य | अनुपस्थित |
| ३०) | डॉ. अनिल करवंदे | सदस्य | अनुपस्थित |
| ३१) | डॉ. अतुल व्ही. कुलकर्णी | सदस्य | अनुपस्थित |
| ३२) | डॉ. मकरंद श्रीकृष्ण कुलकर्णी | सदस्य | अनुपस्थित |
| ३३) | डॉ. श्रीमती नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर (मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्या | उपस्थित |
| ३४) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| ३५) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य | उपस्थित |
| ३६) | डॉ. सिद्राम रामचंद्र पुजारी<br>(अध्यक्ष - रसायनशास्त्र अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३७) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>(अध्यक्ष - सिव्हील इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३८) | डॉ. भाग्येश बलवंतराव देशमुख<br>(अध्यक्ष - मेकॅनिकल इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३९) | डॉ. विजय अनंत आठवले<br>(अध्यक्ष - कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ४०) | डॉ. अनिल मारुती साळुंखे<br>(अध्यक्ष- हिंदी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ४१) | डॉ. विष्णु बब्रुवान वाघमारे<br>(अध्यक्ष - इतिहास अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ४२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

## : निमंत्रित सदस्य:

| अ.क्र | निमंत्रितांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १) | एस. डी. चव्हाण, समन्वयक, पदार्थविज्ञान अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २) | प्रा. डॉ. बी. जे. लोखंडे, समन्वयक, इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३) | विदीन कांबळे, समन्वयक, झूलॉजी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४) | डॉ. टी. आर. मगर, समन्वयक, भूगोल अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ५) | श्रीमती जे. डी. माशाळे, समन्वयक, गणित अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ६) | एम. एन. जगताप, समन्वयक, बॉटनी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ७) | डॉ. डी. डी. कुलकर्णी<br>समन्वयक, जिओलॉजी ॲन्ड जिओइन्फॉर्मेटिक्स अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ८) | डॉ. एस. एन. देशपांडे समन्वयक, मायक्रोबायोलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ९) | डॉ. आर. एस. मेंते, समन्वयक, कॉम्पुटर सायन्स अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १०) | डॉ. डी. एम. झोंबाडे, समन्वयक, सांख्यिकी आणि बायोसॅस्टीक्स अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ११) | डॉ. एस. वाय. जाधव, समन्वयक, एन्ट्रेप्रेन्युअरशिप अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १२) | डॉ. एस. पी. देशमुख, समन्वयक, ॲग्रो केमिकल्स ॲन्ड पेस्ट मॅनेजमेंट अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १३) | डॉ. ऋषिकेश धनवे, समन्वयक, बायोटेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १४) | डॉ. एम. एस. कलशेट्टी, समन्वयक, अलाईड हेल्थ सायन्सेस अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती ए. एस. लावंड, समन्वयक, कॉसमेटिक टेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| १६) | डॉ. व्ही. टी. वडेर, समन्वयक, इनवॉरमेंटल सायन्स अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १७) | डॉ. सचिन गेंगजे, समन्वयक, इलेक्टॉनिक्स इंजिनिअरींग अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १८) | व्ही. व्ही. खरात, समन्वयक, जनरल इंजिनिअरींग अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| १९) | दिप्ती तांबोळी, समन्वयक, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २०) | डॉ. एस. एस. कलशेट्टी, समन्वयक, फार्मसी अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २१) | डॉ. एस. एस. शिरगन, समन्वयक, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २२) | डॉ. श्रीमती एम.ए.निरगुडे, समन्वयक, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २३) | श्रीमती ए. एन. काटगावकर, समन्वयक, बी-आर्किटेक्चर अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २४) | डॉ. अमोल बोबडे, समन्वयक, वाणिज्य अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २५) | प्राचार्य डॉ. आर. एस. ढेरे, समन्वयक, अकौटंन्सी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २६) | प्राचार्य डॉ. डी. आर. बाड, समन्वयक, बिझनेस इकॉनॉमिक्स अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| २७) | प्राचार्य डॉ. महेंद्र कदम, समन्वयक, मराठी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २८) | डॉ. मनोहर जोशी, समन्वयक, इंग्रजी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| २९) | डॉ. संगमेश्वर निला, समन्वयक, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ३०) | डॉ. बद्रीनाथ दामजी, समन्वयक, अर्थशास्त्र अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३१) | डॉ. गुरुसिध्दय्या स्वामी, समन्वयक, कन्नड अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३२) | डॉ. जी. एन. शेख, समन्वयक, उर्दू/पर्शियन अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३३) | डॉ. रेवा कुलकर्णी, समन्वयक, संस्कृत अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३४) | डॉ. महावीर शास्त्री, समन्वयक, पाली/प्राकृत अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३५) | डॉ. आर. एन. जाधव, समन्वयक, ए.आय.एच.सी.ॲन्ड ए. अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३६) | डॉ. बाळासाहेब मुळीक, समन्वयक, तत्वज्ञान अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३७) | डॉ. सोपान मोहिते, समन्वयक, मानसशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ३८) | डॉ. रामेश्वर मोरे, समन्वयक, समाजशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ३९) | प्रा. डॉ. गौतम कांबळे, समन्वयक, ग्रामीण विकास अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४०) | डॉ. श्रीमती एस. जे. गायकवाड, समन्वयक, विधी अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४१) | कॅप्टन डॉ. महादेव थोरात समन्वयक, एन. सी. सी. अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४२) | डॉ. राजेंद्र वडजे, समन्वयक, एन. एस. एस. अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४३) | डॉ. मारोती घंटेवाड, समन्वयक, लोकप्रशासन अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४४) | डॉ. सुरेश पवार, समन्वयक, शारिरीक शिक्षण अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४५) | डॉ. प्रविण आडसकर, समन्वयक, ग्रंथालय व माहितीशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४६) | डॉ. राजेंद्र गोणारकर, समन्वयक, पत्रकारिता व जनसंज्ञापन अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४७) | डॉ. दुर्गेश नरपत वळवी, समन्वयक, समाजकार्य शिक्षण अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |
| ४८) | डॉ. श्रीमती अबोली सुलाखे, समन्वयक, संगीत अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ४९) | डॉ. शिरीष अंबेकर, समन्वयक, ललित कला अस्थायी अभ्यासमंडळ | अनुपस्थित |
| ५०) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, समन्वयक, कौशल्य विकास अस्थायी अभ्यासमंडळ | उपस्थित |

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य, निमंत्रित सदस्य यांचे स्वागत केले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०१ ]</td><td>

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालीन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन विद्यापरिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील, कलम १०७(५) नुसार विद्यापीठ उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी सम्यक योजनेशी अनुरुप अशी वार्षिक योजना दरवर्षी तयार करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सुरु करील आणि तो कालबध्द कार्यक्रम ज्या वर्षात उच्च शिक्षणाची नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था सुरु करावयाची असतील त्या वर्षाच्या आधीचे शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी प्रसिध्द करतील अशी तरतूद आहे.

त्याअनुषंगाने मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा. नरेंद्र जाधव समितीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे GIS platform चा वापर करुन प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा बृहत आराखडा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करणे संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>कालावधी</th></tr>
<tr><td>१)</td><td>सर्व अकृषी विद्यापीठांनी महाविद्यालयांचे स्थळबिंदू GIS संगणक प्रणालीमध्ये भरणे.</td><td>दि. २४ जून २०२४ ते दि. ०३ जुलै २०२४</td></tr>
<tr><td>२)</td><td>सर्व अकृषी विद्यापीठांनी संबंधित प्राधिकरणांची मान्यता घेऊन शासनाला आराखडा सादर करणे.</td><td>दि. २० जुलै २०२४ पर्यंत</td></tr>
</table>

त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरिता स्थानिक वर्तमान पत्रामध्ये दि.२६/०६/२०२४ रोजी जाहीर निवेदन देण्यात येवून दि.०१/०७/२०२४ पर्यंत नवीन महाविद्यालय सुरु करणे संदर्भातील व नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणे संदर्भातील निवेदन मागविण्यात आली आहेत. दि.२६/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकूलाचेही प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर जाहीर निवेदनास व प्रस्तावास अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त झालेल्या निवेदनांची छाननी करणेकामी छाननी समितीची बैठक दि.०२/०७/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. डॉ. पी. एम. पवार, प्रभारी अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारती मध्ये संपन्न झाली.

सदर बैठकीत यापूर्वी उपसचिव, महाराष्ट्र शासन यांच्या दि.०८/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा एक वर्षाचा बृहत आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा, मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९/०४/२०२४ रोजी संपन्न झालेल्या अभ्यास समितीच्या बैठकीत प्रस्तुत विद्यापीठाच्या अंतर्गत सर्व अभ्यासक्रम व महाविद्यालयांच्या नोंदी अद्ययावत करण्यात आल्या आहेत त्याबाबतचा आढावा घेण्यात आला.

</td><td>संलग्नता विभाग</td></tr>
</table>

त्याप्रमाणेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या बृहत आराखड्यातील प्रस्तावांच्या नामंजूरीमूळे नवीन महाविद्यालयाचे बिंदू ठिकाण रिक्त राहत असल्यास सदर बिंदू/ठिकाण शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या बृहत आराखड्यात समाविष्ट करुन महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्या दि.२२/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार टेंभूर्णी व मंगळवेढा हे स्थळबिंदू सन २०२५-२६ च्या बृहत आराखड्यात समाविष्ट करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेवून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील, कलम १०७ (५) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पंचवार्षिक सम्यक योजनेशी अनुरूप प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा एक वर्षाचा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त झालेल्या निवदेनांची छानननी करून तसेच दि.२२/०५/२०२४ व २४/०६/२०२४ रोजीच्या शासन पत्रांन्वये केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करून प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा बृहत आराखडा तयार करणेबाबतचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी अधिष्ठाता मंडळास सादर करण्यात आला.

सदरचा अहवाल व अनुषांगिक प्राप्त निवेदने दि.०६/०७/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर केला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७ (१) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरूप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करणेकामी प्राप्त निवेदनांची छाननी करुन तयार करण्यात आलेला अल्पकालिन बृहत आराखडा सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आला."

सदरील अल्पकालीन बृहत आराखड्यात व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते केलेली दुरुस्तीसह शिफारस विद्यापरिषदेच्या दि.०९/०७/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आलेली आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत अध्यक्ष, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांनी विधी रात्र महाविद्यालय संदर्भात व चित्रकला पदवी महाविद्यालया संदर्भात निवदेन दि.०९/०७/२०२४ रोजी सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे प्रभारी प्राचार्य, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते यांनी दि.०९/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये एम.एस्सी. (रसायनशास्त्र), बी. ए. (Physical Education), बी. एस्सी. (Botany), बी. एस्सी. (Statistics), तर प्रतापसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयात बी. कॉम., एम.एस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र), एम. एस्सी. (रसायनशास्त्र) संदर्भात निवेदन दिलेले आहे. प्राचार्य, महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक (विज्ञान) विद्यालय, वरवडे, ता. माढा यांनी दि.१०/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये बी.एस्सी विज्ञान शाखेसंदर्भात निवेदन दिले आहे. सदरील निवेदनांच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दि.११/०७/२०२४ रोजी मा. प्र-कुलगुरू महोदय यांनी उपकुलसचिव, संलग्नता विभाग यांना भ्रमणध्वनीव्दारे उपरोक्त निवेदने आज दि.११/०७/२०२४ रोजी आयोजित केलेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये विषय सादर करणेबाबत तोंडी आदेश दिलेले आहेत. त्याअनुरोधाने अधिष्ठाता मंडळाच्या दि.११/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला असता त्यावर अधिष्ठता मंडळाने खालील प्रमाणे ठराव केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| | "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालीन बृहत आराखडा पुढील कार्यवाहीसाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली आहे."<br>उपरोक्त शिफारशीच्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव केलेला आहे.<br>"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८ - २९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालीन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन विद्यापरिषदेस शिफारस केलेली आहे."<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरूप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालीन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन विद्यापरिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालीन बृहत आराखड्यास व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस शिफारस करण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०२ ] | **कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सुचना कळविल्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७६ मधील तरतुदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/०८/२०२३ रोजीच्या बैठकीत अकृषी विद्यापीठाने सादर केलेल्या सन २०२४-२५ ते २०२८-२९ या पंचवार्षिक आराखड्यास मान्यता दिलेली असल्याचे व महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या दि.३०/०८/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेल्या सन २०२४-२५ ते २०२८-२९ पंचवार्षिक आराखड्यातील स्थळबिंदू शिवाय विद्यमान सन २०२५-२६ रोजीच्या वार्षिक बृहत आराखड्याकरिता शैक्षणिक संस्थांनी नवीन महाविद्यालये स्थापन करण्याकरिता इतर नवीन स्थळबिंदू सूचविले असल्यास सदरहू नवीन स्थळबिंदूंचा समावेश सन २०२५-२६ च्या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये करण्यात येऊ नये असे नमुद करुन कळविले आहे.<br>सबब, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सुचना कळविल्याची बाब विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव: | **कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सूचनानुसार कार्यवाही करण्यास व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस शिफारस करण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **आगामी पेट-९ मध्ये संशोधक मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करताना संशोधन केंद्र उपलब्ध करुन देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी:<br>सदंर्भ: अधिष्ठाता मंडळाचा दि.०६/०७/२०२४ रोजीचा ठराव क्र.८.<br>प्रस्तुत विद्यापीठाने UGC Regulation २०२२ अन्वये तयार करण्यात आलेली नियमावली यापूर्वीच विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. त्याअनुषंगाने संशोधन विभागाकडून पेट-९ पीएच.डी. प्रवेशाबाबतची प्रक्रिया सुरु असून, सध्या प्रवेश पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर पेटकरीता अर्ज करण्याची प्रक्रिया दि.१३/०६/२०२४ पासून सुरु झाली असून, दि.२१/०७/२०२४ रोजी परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.<br>संशोधन विभागाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार (UGC Regulation २०२२) ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे अशा महाविद्यालयातील कार्यरत पात्र मार्गदर्शकांकडून रिक्त जागांचा तपशील मागवून घेवून त्यानुसार एकुण १६३ मार्गदर्शकांकडील ४७६ रिक्त जागांचा तपशील जाहिरात प्रसिध्द करताना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.<br>तथापि, प्रसिध्द केलेल्या तपशीलमधील काही महाविद्यालयामध्ये काही विषयांकरीता संशोधन केंद्र नाही अथवा त्यांनी अजून मान्यता घेतलेली नाही. तसेच काही महाविद्यालयास संबंधीत विषयास यापूर्वी संशोधन केंद्र म्हणून मान्यता आहे, तथापि, सद्यपरिस्थितीमध्ये तेथे एकच मार्गदर्शक कार्यरत आहेत, त्याचप्रमाणे काही महाविद्यालयामध्ये संबंधीत विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे. तथापि, एकच संशोधक मार्गदर्शक उपलब्ध आहे. सोबत अशा महाविद्यालयांची यादी जोडली आहे.<br>संशोधन केंद्र मान्यतेकरीता संबंधीत विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम व किमान ०२ संशोधक मार्गदर्शक कार्यरत असणे बंधनकारक आहे. त्यामुळे एकच संशोधक मार्गदर्शक उपलब्ध असलेल्या महाविद्यालयातील मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करताना सदर विद्यार्थ्यांना संशोधन केंद्र देण्याबाबत अडचण येणार आहे.<br>उपरोक्त बाब पाहता,<br>१. ज्या महाविद्यालयामध्ये सबंधीत विषयाचा पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरु आहे. तथापि, एकच संशोधक मार्गदर्शक उपलब्ध असल्याने अशा महाविद्यालयामध्ये नियमाप्रमाणे संशोधन केंद्र नाही अशा संशोधक मार्गदर्शकांना तसेच;<br>२. महाविद्यालयास संबंधीत विषयास यापूर्वी संशोधन केंद्र म्हणून मान्यता आहे, तथापि, सद्यपरिस्थितीमध्ये तेथे एकच संशोधक मार्गदर्शक कार्यरत आहेत.<br>अ.क्र. १ व २ बाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. | संशोधन विभाग |

<table>
<tr>
<td></td>
<td>
याबाबत सदर विषय अधिष्ठाता मंडळाच्या दि.०६/०७/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवला असता ठराव क्र.८ पुढीलप्रमाणे झाला आहे.
<table>
<tr>
<td>ठराव क्र. ८</td>
<td>
आगामी पेट-९ मध्ये संशोधक मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करताना संशोधन केंद्र उपलब्ध करुन देणेसाठी खालीलप्रमाणे धोरणात्म निर्णय घेण्यात आले.
१. ज्या महाविद्यालयात २ पात्र संशोधक मार्गदर्शक व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे, परंतु संशोधन केंद्र म्हणून मान्यता नाही, अशा महाविद्यालयाकडून संशोधन केंद्रासाठी प्रस्ताव मागवून संशोधन केंद्र उपलब्ध करुन द्यावेत.
२. ज्या महाविद्यालयात १ पात्र संशोधक मार्गदर्शक आहे तसेच संबंधीत विषयाच्या संशोधन केंद्रास यापूर्वी मान्यता आहे, अशा महाविद्यालयातील संशोधक मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करताना त्यांच्या महाविद्यालयाचे संशोधन केंद्र द्यावे लागणार आहे.
३. ज्या महाविद्यालयात १ पात्र संशोधक मार्गदर्शक व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे, तथापि, संशोधन केंद्र नाही, अशा संशोधक मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करण्यासाठी विद्यापीठ संशोधन केंद्र देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.
उपरोक्त अ.क्र. १ ते ३ विद्यापरिषदेकडे शिफारस करण्याबाबत सर्वानुमते ठरले.
</td>
</tr>
</table>
सबब, आगामी पेट-९ मध्ये संशोधक मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करताना संशोधन केंद्र उपलब्ध करुन देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.
</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>ठराव:</td>
<td>
आगामी पेट-९ मध्ये संशोधक मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करताना संशोधन केंद्र उपलब्ध करुन देणेबाबत सर्वानुमते खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.
"ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे, अशा संशोधन मान्यता केंद्रात एक मान्यताप्राप्त शिक्षक असेल तरी त्यांना PET-९ मधील विद्यार्थी वितरीत करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले."
</td>
<td></td>
</tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०४ ]</td><td>जे विद्यार्थी सन २०१२ व त्यापूर्वी पीएच.डी. करीता प्रवेशीत आहेत व ज्यांची मुदत संपलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना दि.३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत व सदर विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त रु.१०,०००/- दंड आकारण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: संदर्भ: अधिष्ठाता मंडळाचा दि.०६/०७/२०२४ रोजीचा ठराव क्र.८(१).<br>मा. प्र-कुलगुरु यांच्या आदेशानुसार पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी ज्या संशोधक विद्यार्थ्यांनी सन २०१५ किंवा त्यापूर्वी नोंदणी झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता, अशा सर्व विद्यार्थ्यांना पुर्ननोंदणीचा कालावधी तसेच शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त दंड घेवून कालावधी वाढवून त्यांना अंतिम प्रबंध सादर करण्यास परवानगी देण्यासंर्भातील मा. अधिसभा सदस्य, प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार अधिष्ठात मंडळासमोर दि.०६/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला.<br>यासंदर्भात डॉ. प्रा. भगवान आदटराव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे दि.२०/०६/२०२४ रोजीचे परिपत्रक अर्जासोबत जोडले आहे. सदर परिपत्रकामध्ये अशा प्रकारची मुदतवाढ देण्यात आलेली दिसून येत आहे.<br>याबाबत सदर विषय अधिष्ठाता मंडळाच्या दि.०६/०७/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. ८(१) पुढील प्रमाणे झाला आहे.<br><table><tr><td>ठराव क्र.८(१)</td><td>सन २००९ च्या UGC Regulations चा आधार घेवून व विद्यार्थी हित लक्षात घेता, सन २०१२ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांचे पीएच.डी. प्रवेश आहेत व ज्यांची मुदत संपलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना दि.३१/०१२/२०२४ पर्यंत मुदवाढ देण्याची विद्यापरिषदेकडे शिफारस करण्यात आली.<br>तसेच सदर विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त रु.१०,०००/- दंड आकारण्याबाबतची सर्वानुमते विद्यापरिषदेकडे शिफारस करण्यात आली.</td></tr></table>सबब, जे विद्यार्थी सन २०१२ व त्यापूर्वी पीएच.डी. करीता प्रवेशीत आहेत व ज्यांची मुदत संपलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना दि.३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत व सदर विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त रु.१०,०००/- दंड आकारण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.</td><td>संशोधन विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>सन २०१२ व त्यापूर्वी पीएच.डी. करीता प्रवेशित आहेत व ज्यांची मुदत संपलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना दि.३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मा.प्र-कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली RAC समितीतील दोन सदस्य Expert (subject wise) म्हणून नियुक्ती करावी. सदर समितीने case to case अभ्यास करुन मुदतवाढीबाबत निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.<br>तसेच सदर विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त रु.१०,०००/- दंड आकारण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab. etc) पध्दतीने आयोजित करण्याबातची परीक्षा व मूल्यमापन मंडळाची शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाची जुलै २०२४ मध्ये होणारी पीएच.डी प्रवेश पुर्व परीक्षा विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार दि.३०/०७/२०२४ व ३१/०७/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.<br>परीक्षा विभागामार्फत पदव्युत्तर प्रवेश पुर्व परीक्षा ही ऑनलाईन वेब बेस्ड पध्दतीने आयोजित करण्यात आली होती व ती यशस्वीपणे पार पाडण्यात आली असून पदव्युत्तर प्रवेश पुर्व फेर परीक्षा देखिल ऑनलाईन वेब बेस्ड पध्दतीने आयोजित करण्यात आली आहे.<br>पीएच.डी प्रवेश पुर्व परीक्षा ही प्रथम ऑनलाईन संगणकीय पध्दतीने घेण्याबाबत नियोजन करण्यात आलेले होते. पंरतू सदर परीक्षेकरीता अंदाजे ३००० व त्या पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षार्थी म्हणून बसणार असल्याने संगणकीय पध्दतीने परीक्षा घेण्याकरीता तीन ते चार पेक्षा जास्त परीक्षा केंद्र निश्चित केले तर विद्यार्थ्यांची गैरसोय होईल व तसेच सदर परीक्षेसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील किंवा परदेशामध्ये वास्तव्य असणारे विद्यार्थी अर्ज करतात त्यांची ही गैर सोय होवू नये. अशी या विभागाची धारणा आहे.<br>सबब, माहे जुलै-२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट-९) ही ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याची बाब दि.११/०७/२०२४ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर केली असता सदर विषयाबाबत सर्वंकष चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.<br>ठराव :<br>अ) माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>पेट-९ परीक्षा एकापेक्षा अधिक विषयामध्ये देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एकाच दिवशी घेण्यात यावी असे ठरले. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

| | | |
|---|---|---|
| | ब) तसेच पेट-९ परीक्षेतील गैरप्रकार टाळण्याकरिता सर्व्हीस प्रोव्हायडर यांनी आवश्यक ती सर्व माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना दिली. तसेच सभागृहाने गैरप्रकार टाळण्याकरिता विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना देण्याच्या अनुषंगाने SOP तयार करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br>१) डॉ. प्रशांत पवार- अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - अध्यक्ष<br>२) डॉ.आर.एस. मेंते-सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - सदस्य<br>३) डॉ. शशिकांत तांबे- सहयोगी अधिष्ठाता, आंतरविद्याशाखा - सदस्य<br>४) डॉ. एस. डी. राऊत- संगणकशास्त्र संकुल - सदस्य<br>५) डॉ. म. स. रोकडे, उपकुलसचिव - सदस्य सचिव<br>६) सर्व्हिस प्रोव्हायडर प्रतिनिधी - सदस्य<br>क) सदरचा विषय आगामी विद्यापरिषदेच्या व व्यवस्थान परिषदेच्या बैठकीत ठेवण्याचे ठरले.<br>सबब, माहे जुलै-२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट-९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याबातची परीक्षा व मूल्यमापन मंडळाची शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्वपरीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड** (Android phone, Computer or Laptop, Tab etc) **पध्दतीने आयोजित करण्याबाबतची परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या सर्व शिफारशी स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(१) ] | **शैक्षणिक वर्ष २०२-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तक्त्यानुसार नवीन आराखड्याप्रमाणे सुरु होणारा आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत येणारा पदव्युत्तर अभ्यासक्रम M.A. Part-II Yoga विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार नवीन आराखड्याप्रमाणे आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत येणारा M.A. Part-II Yoga अभ्यासक्रम दि.०२/०५/२०२४ रोजीच्या शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळाने मान्यता देवून आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेकडे शिफारस केली आहे. या शिफारशीस आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेकडे शिफारस केली आहे. या शिफारशीस आंतर-विद्याशाखेचे मा.प्र.अधिष्ठाता यांनी सदर अभ्यासक्रम विद्याशाखेच्यावतीने स्विकारुन मान्यता प्रदान केली आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तक्त्यानुसार नवीन आराखड्याप्रमाणे सुरु होणारा आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत येणारा पदव्युत्तर अभ्यासक्रम M.A. Part-II Yoga विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तक्त्यानुसार नवीन आराखड्याप्रमाणे सुरु होणारा आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत येणाऱ्या M.A. Part-II Yoga या पदव्युत्तर अभ्यासक्रमास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

डॉ. हनुमंत कृष्णा अवताडे यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(२) ] | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये NEP २०२० लागू करण्यात येत असल्याने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या पदवी प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना २०२४-२५ मध्ये पुढील वर्गात प्रवेश देण्यास मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये NEP २०२० लागू करण्यात येत असल्याने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या पदवी प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना २०२४-२५ मध्ये पुढील वर्गात प्रवेश देण्याबाबत, यापूर्वी गठीत केलेल्या समितीने याबाबत अहवाल तयार करुन अधिष्ठाता मंडळासमोर सादर करावा असे सर्वानुमते ठरले. | |

प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(३) ] | पीएच.डी. कोर्सवर्क भूगोल या विषयाची परीक्षा मराठी व इंग्रजी या विषयातून लिहण्याबाबत व प्रवेशावेळी नमूद केलेल्या Medium of Instruction & Language of Answer प्रमाणे परीक्षा देण्यास परवानगी मिळण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | पीएच.डी. कोर्सवर्क भूगोल या विषयाची परीक्षा मराठी व इंग्रजी या विषयातून लिहण्याबाबत व प्रवेशावेळी नमूद केलेल्या Medium of Instruction & Language of Answer प्रमाणे परीक्षा देण्यास परवानगी देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

कुलसचिव
(सदस्य सचिव, विद्यापरिषद)

२९/७/२०२४

मा. कुलगुरु
(अध्यक्ष, विद्यापरिषद)